


# पारनेर दर्शन




वर्ष ४ अंक ३९, शनिवार २८ मार्च २०२६ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

## तालुक्याच्या ठिकाणी कृषी विद्यापीठ उपकेंद्र हवे

**खासदार नीलेश लंके यांची ठोस मागणी | दुष्काळी पट्ट्यासाठी संसदेत बुलंद आवाज | नियम ३७७ अंतर्गत केंद्र सरकारकडे हस्तक्षेपाची विनंती**

नवी दिल्ली : प्रतिनिधी
लोकसभेच्या १८व्या अधिवेशनातील सातव्या सत्रात नियम ३७७ अंतर्गत खासदार नीलेश लंके यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्याचा प्रश्न प्रभावीपणे मांडला. नगर, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर, पाथर्डी आणि शेवगाव या सात तालुक्यांतील शेतकरी दीर्घकाळापासून नैसर्गिक प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



### दुष्काळी चक्रात अडकलेली शेती
या भागातील शेती प्रामुख्याने कोरडवाहू स्वरूपाची असून, उन्हाळ्यातील पाण्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. अपुरा आणि अनियमित पाऊस, जमिनीचा कमी सुपीक पोत, भूजल पातळीतील सातत्याने घट या सर्व घटकांमुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटत असून कर्जबाजारीपणाची समस्या वाढत चालली आहे.

### ‘स्थानिक संशोधन केंद्र’ हीच काळाची गरज
खासदार लंके यांनी स्पष्ट केले की, जिल्ह्याच्या भौगोलिक व हवामानाच्या वैशिष्ट्यांनुसार स्वतंत्र संशोधन केंद्र उभारणे अत्यावश्यक आहे. अशा उपकेंद्रामुळे स्थानिक पिकांवर आधारित संशोधनाला चालना मिळेल, दुष्काळी परिस्थितीत टिकणाऱ्या वाणांचा विकास होईल, ठिबक, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण यांसारख्या तंत्रांचा प्रसार होईल आणि शेतकऱ्यांना ‘फील्ड लेव्हल’वर मार्गदर्शन मिळेल.

### ‘कमी पाण्यात जास्त उत्पादन’
दुष्काळी पट्ट्यातील शेतीसाठी ‘वॉटर मॅनेजमेंट’ अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. उपकेंद्राच्या माध्यमातून कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या पद्धती विकसित केल्या जातील, जलसंधारण व मृदसंधारण तंत्रज्ञानाचा प्रसार होईल, हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धती विकसित होतील.

### तातडीच्या निर्णयाची मागणी
अध्यक्षांच्या माध्यमातून कृषी व शेतकरी कल्याण मंत्र्यांना उद्देशून खासदार लंके यांनी नम्र पण ठाम शब्दांत मागणी केली की अहिल्यानगर जिल्ह्यातील सात तालुक्यांपैकी कोणत्याही एका ठिकाणी कृषी विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच, या संदर्भात जिल्हास्तरावर थेट हस्तक्षेप करून प्रक्रिया गतीमान करावी.

### अंमलबजावणीत समन्वयाचा अभाव
केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांमध्ये आवश्यक तो समन्वय नसल्यामुळे अनेक प्रकल्प रखडले असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यामुळे निधी वेळेवर उपलब्ध होत नाही, योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचत नाही तसेच विकास प्रक्रियेला गती मिळत नसल्याकडे खा. लंके यांनी लक्ष वेधले.

### शेतकऱ्यांसाठी ‘गेमचेंजर’ ठरणार
या उपकेंद्राची स्थापना झाल्यास शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान थेट त्यांच्या गावात उपलब्ध होईल, उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होईल आणि दुष्काळी भागातील शेती अधिक टिकाऊ बनेल.


### नव्या पर्वाची अपेक्षा
अहिल्यानगर जिल्हा कृषी, शिक्षण आणि युवकशक्तीच्या दृष्टीने सक्षम असूनही आवश्यक पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मागे पडत आहे. कृषी विद्यापीठाचे उपकेंद्र ही केवळ सुविधा नसून, या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी नवे पर्व ठरू शकते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### युवकांसाठी संशोधन व रोजगाराची दारे
अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण युवकांमध्ये मोठी क्षमता असून, त्यांना योग्य दिशा मिळाल्यास कृषी क्षेत्रात मोठे योगदान देता येईल, असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला. कृषी संशोधनात स्थानिक युवकांचा सहभाग वाढेल, प्रशिक्षण, इंटर्नशिप व रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि कृषी आधारित स्टार्टअप्सना चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## नगर-कल्याण महामार्गाच्या ठेकेदाराला नोटीस

**कॉंक्रीटीकरण कामातील निकृष्ट दर्जावर रवींद्र राजदेव यांचा आक्षेप | राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण ॲक्शन मोडमध्ये**

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी
अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर नीलेश लंके प्रतिष्ठान आक्रमक झाले आहे. उपाध्यक्ष रविंद्र राजदेव यांनी केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण ने संबंधित ठेकेदारांकडून तातडीने अहवाल मागविला असून, कामातील त्रुटी सात दिवसांत दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत.



### कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्हे
सावरगाव-काळेवाडी परिसरात नुकतेच करण्यात आलेल्या कॉंक्रीटीकरणात गंभीर त्रुटी आढळल्याचा आरोप करण्यात आला आहे. कॉंक्रीट टाकल्यानंतर लगेचच रस्त्यावर चिरा पडत असल्याचे निदर्शनास आले असून, योग्य ‘क्युरिंग’ न झाल्यामुळे कामाचा दर्जा खालावत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. हजारो कोटींच्या प्रकल्पात अशा प्रकारचा निष्काळजीपणा होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### देखरेखीचा अभाव
कामाच्या ठिकाणी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ठेकेदारांकडून केवळ तात्पुरत्या अभियंत्यांमार्फत काम चालवले जात असून, दर्जा तपासणीची कोणतीही ठोस यंत्रणा दिसत नसल्याचे निवेदनात नमूद आहे.

### सुरक्षा उपाययोजनांचा अभाव
काम सुरू असलेल्या ठिकाणी कोणतेही सूचना फलक, सिग्नल, गार्ड किंवा प्रकाशयोजना नसल्याने वाहनचालकांसाठी परिस्थिती धोकादायक बनली आहे. काळेवाडी येथे नुकत्याच झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून, या प्रकारासाठी संबंधित ठेकेदारांना जबाबदार धरावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### ‘रस्ता रोको’ आंदोलनाची तयारी
सावरगाव, काळेवाडी, मानेवाडी, नांदूर पठार आदी गावांतील नागरिकांनी एकत्र येत प्रशासनाला इशारा दिला आहे. आठ दिवसांत कामाचा दर्जा सुधारला नाही आणि अपघातग्रस्तांना मदत मिळाली नाही, तर २५ गावांच्या ग्रामपंचायतींचे ठराव घेऊन महामार्गावर ‘रस्ता रोको’ आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

### अहवाल सादर करण्याचे आदेश
रविंद्र राजदेव यांच्या निवेदनाची दखल घेत राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणने संबंधित ठेकेदार आणि सल्लागार कंपन्यांना नोटीस पाठवली आहे. कामातील त्रुटींवर सविस्तर अहवाल सादर करण्यास सांगितले असून, दोष तातडीने दुरुस्त करून सात दिवसांत ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### स्थानिक मागण्या
अपघात टाळण्यासाठी महत्त्वाच्या चौकांवर स्पीड ब्रेकर उभारावेत, तसेच वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. स्थानिकांच्या तीव्र नाराजीमुळे आणि आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे प्रशासनावर दबाव वाढला आहे. आता राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व ठेकेदार यंत्रणा प्रत्यक्षात कितपत सुधारणा करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कर्तव्य बजावताना पोलिसांवर हल्ला

**| नगरमध्ये जमावाचा संताप अनावर | दगडफेक व मारहाणीत ७ जखमी | १०० जणांवर गुन्हा, ६ जण ताब्यात**

अहिल्यानगर : प्रतिनिधी
शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर जमावाकडून मारहाण व दगडफेक झाल्याची गंभीर घटना नगर-सोलापूर रोडवरील तुक्कड ओढा परिसरात गुरुवारी (दि. २६) रात्री घडली. या हल्ल्यात सात पोलिस कर्मचारी जखमी झाले असून शासकीय वाहनाचेही नुकसान झाले आहे. या प्रकरणी १०० जणांच्या जमावाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्त घालत असताना योगेश पंडित बेरड (रा. वाकोडी) याने मोटारसायकल आडवी लावून पोलिसांचे वाहन अडवले. त्यानंतर त्याने आपल्या सहकाऱ्यांना उर्वरीत पान ३ वर

## धोक्याच्या छायेत ‘गॅस काळाबाजार’!

**नगरमध्ये अवैध रिफिलिंग अड्ड्यावर पोलिसांचा छापा**

अहिल्यानगर : प्रतिनिधी
शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंगच्या धोकादायक प्रकारावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकत कारवाई केली. गुलमोहर रोडवरील पारीजात चौकाजवळील एका पत्र्याच्या गोदामात घरगुती गॅस टाक्यांची बेकायदेशीर साठवणूक करून त्यातून व्यावसायिक टाक्यांमध्ये गॅस भरण्याचा प्रकार सुरू असल्याचे उघडकीस आले.

या प्रकरणी शहानवाज शौकत सय्यद आणि साद अन्वर खान



या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार प्रशांत राम राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली.जिल्ह्यातील गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर अवैध साठवणूक आणि रिफिलिंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे उर्वरीत पान ३ वर

## जमिनीच्या वादातून ‘जादूटोणा’चा प्रकार

**वृद्ध शेतकरी लक्ष्य | अंधश्रद्धा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल**

अहिल्यानगर : प्रतिनिधी
जमिनीच्या जुन्या वादातून एका ७५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्यावर जादूटोणा करून मानसिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार नगर तालुक्यातील आव्हाडवाडी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आव्हाडवाडी येथील रहिवासी आबासाहेब दगडू आंधळे



यांचा पोपट एकनाथ पालवे याच्यासोबत जमिनीचा वाद सुरू होता. या वादातूनच २६ मार्च रोजी पहाटे सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास आंधळे यांच्या घराच्या गेटसमोर जादूटोण्याचा प्रकार केल्याचे उर्वरीत पान ३ वर

## श्रीपाद छिंदमला महापालिकेतून हाकललं !

**| “छत्रपतींचा अवमान करणाऱ्याला सभागृहात जागा नाही” | सर्वच नगरसेवकांचा संताप उसळला**

अहिल्यानगर : प्रतिनिधी
अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सभेत वादग्रस्त नगरसेवक श्रीपाद छिंदम याला अक्षरशः हाकलून लावण्याची घटना घडली. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत अपशब्द काढल्याच्या पार्श्वभूमीवर संतप्त झालेल्या सत्ताधारी आणि विरोधी नगरसेवकांनी एकत्र येत छिंदमविरोधात जोरदार आक्रमक भूमिका घेतली.

अंदाजपत्रकीय चर्चे दरम्यान छिंदम यांनी सहभाग घेण्याचा प्रयत्न करताच सभागृहात वातावरण पेटले. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक संपत बारस्कर, गणेश भोसले, मयूर बांगरे, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, विकी जगताप यांनी ठाम भूमिका घेत “छिंदमला सभागृहात बसू देऊ नका!” अशी मागणी उर्वरीत पान ३ वर



### “ठराव करा, अन्यथा सभात्याग!”
नगरसेवकांनी स्पष्ट इशारा दिला की “ज्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला, त्याला सभागृहात प्रवेश देणार नाही.” याबाबत अधिकृत ठराव अजेंड्यावर घेऊन कायदेशीर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. “पुढील सभेत हा विषय नसेल, तर आम्ही सभागृहात थांबणार नाही,” असा इशाराही देण्यात आला.

### आधीही झाली होती कारवाई
छिंदम याच्यावर यापूर्वीही कारवाई करून त्याचे पद रद्द करण्यात आले होते. मात्र पुन्हा सभागृहात येण्याच्या प्रयत्नामुळे हा वाद उफाळून आला असून आता कायमस्वरूपी बंदीची मागणी जोर धरत आहे. छत्रपतींचा अपमान सहन न करणाऱ्या महाराष्ट्राच्या भावनांचे प्रतिबिंब या घटनेत स्पष्ट दिसले.

## “या रे या गड स्वच्छ करायला या!”

**| लोहगडावर मावळ्यांची हाक | खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली शिवकालीन गडकोट संवर्धनाची मोहीम | पर्यावरण, स्वच्छता आणि वारसा जतनाचा संगम**

अहिल्यानगर : प्रतिनिधी
सह्याद्रीतील छत्रपती शिवाजी महाराजांचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखालील आपला मावळा या सामाजिक संघटनेमार्फत दर महिन्याला आयोजित करण्यात येणारी गटकोट संवर्धन व स्वच्छता मोहिम या महिन्यात किल्ले लोहगड येथे रविवार दि.२९ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी १० मार्च रोजी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून खा. लंके यांनी या मोहिमेची घोषणा केली होती. त्यानंतर प्रत्येक महिन्याला एका रविवारी ही मोहीम विविध गडांवर आयोजित करण्यात आलेली आहे. या मोहीमेत युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### सह्याद्रीतील अभेद्य वारसा
पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील किल्ले लोहगड हा सह्याद्रीच्या कुशीत वसलेला ऐतिहासिक गड मराठा साम्राज्याच्या वैभवाची साक्ष देतो. समुद्रसपाटीपासून सुमारे ३ हजार ४०० फूट उंचीवर असलेल्या या गडाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महत्त्वाची लष्करी भूमिका बजावली. लोहगडाची वैशिष्ट्ये म्हणजे त्याची मजबूत तटबंदी, सलग चार दरवाजे गणेश दरवाजा, नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा आणि महादरवाजा, तसेच नैसर्गिक रचनेत तयार झालेला प्रसिद्ध ‘विंचूकाटा’. गडावर असलेली पाण्याची टाकी, दगडी बांधकाम आणि भौगोलिक रचना यामुळे तो इतिहासप्रेमी आणि ट्रेकर्ससाठी आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. मात्र, वाढती पर्यटक संख्या, प्लास्टिक कचरा आणि दुर्लक्ष यामुळे या गडाच्या संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे.

### ‘आपला मावळा’चा पुढाकार
“आपला मावळा” या सामाजिक संघटनेच्या वतीने खासदार नीलेश लंके यांच्या प्रेरणेतून ही भव्य संवर्धन मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ स्वच्छता मोहीम राबवणे नसून,गडकोटांचे जतन व संवर्धन पर्यावरण संरक्षण, इतिहासाविषयी जनजागृती, युवकांना वारशाशी जोडणे असा बहुआयामी आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमात विविध गावांतील युवक, स्वयंसेवी संस्था, इतिहास अभ्यासक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

### मोहिमेचा आराखडा
दिवस: रविवार, २९ मार्च २०२६
वेळ: सकाळी ७:०० वाजता (लवकर सुरुवात; उन्हाचा त्रास टाळण्यासाठी)
स्थळ: किल्ले लोहगड, ता. मावळ, जि. पुणे मोहिमेदरम्यान स्वयंसेवकांना गटांमध्ये विभागून विविध जबाबदाऱ्या दिल्या जाणार आहेत. त्यामध्ये गडावरील कचरा संकलन व व्यवस्थापन, प्लास्टिक निर्मूलन, तटबंदी परिसर स्वच्छता, पायवाटांची निगा, पर्यावरणपूरक संदेश फलक लावणे यांचा समावेश असेल.

### पर्यावरणपूरक उपक्रम
या मोहिमेत “स्वच्छ गड सुंदर गड” हा मुख्य मंत्र ठेवण्यात आला आहे. गड परिसरातील प्लास्टिक, कचरा आणि अनावश्यक वस्तू हटवून नैसर्गिक सौंदर्य जपण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, सहभागी स्वयंसेवकांना गडसंवर्धनाचे महत्त्व, जैवविविधतेचे रक्षण, ऐतिहासिक वास्तूंचे जतन याबाबत मार्गदर्शनही केले जाणार आहे.

### उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन
या मोहिमेत सहभागी होऊन प्रत्येक नागरिकाने इतिहास जतनाची जबाबदारी उचलावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. “गड आपले आहेत, त्यांचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,” असा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. मोहिमेसंदर्भात ९४२२४५८४६२ किंवा ९६३७९४३३३३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या


## 16 वर्षांखालील मुलांचे फेसबुक, इंस्टाग्राम अकाउंट होणार डिलीट

ऑस्ट्रेलियामध्ये सोशल मीडिया वापरकर्त्यांसाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. १० डिसेंबरपासून १६ वर्षांखालील मुले फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि टिकटॉक सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करू शकणार नाहीत. हा निर्णय देशातील नवीन ऑनलाइन सुरक्षा नियमांतर्गत आहे. तथापि, १६ वर्षांखालील मुले पालकांच्या संमतीनेच सोशल मीडिया वापरू शकतात. ऑनलाइन धोक्यांपासून मुलांना वाचवण्यासाठी बनवलेला हा जगातील पहिलाच कायदा आहे. या नियमाचे पालन न करणाऱ्या कंपन्यांना ४९.५ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्स (अंदाजे २७० कोटी रुपये) दंड होऊ शकतो. सोशल मीडियामुळे होणाऱ्या नुकसानीपासून मुलांना वाचवणे हा यामागचा उद्देश आहे. ज्या मुलांना अकाउंट्स बंद होणार आहेत त्यांना हा प्लॅटफॉर्म प्रथम संदेश पाठवेल. या संदेशात मुलांना तीन पर्याय उपलब्ध असतील: त्यांचा डेटा डाउनलोड करणे, त्यांचे प्रोफाइल गोठवणे किंवा अकाउंट पूर्णपणे बंद करण्याची परवानगी देणे. कंपन्या आयडी कागदपत्रे थेट मागण्याऐवजी मुलांचे वय निश्चित करण्यासाठी एआय (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) वापरतील. एआय वापरकर्त्यांच्या वयाचा अंदाज त्यांच्या ऑनलाइन वर्तनावर आधारित करेल, जसे की त्यांना काय आवडते, ते काय टिप्पणी करतात आणि ते कसे काम करतात. जर एखाद्या वापरकर्त्याला वाटत असेल की त्यांचे वय चुकीचे सादर केले गेले आहे, तर ते सेल्फीद्वारे त्यांचे वय पडताळू शकतात.

# मुलांना फोन, टॅबलेट देण्यापूर्वी 5 सेटिंग्ज बदला...

**जेणेकरून त्यांचे डोळे कमकुवत होऊ नयेत!**





**आजकाल, प्रत्येक घरातील लहान मुले मोबाइल फोन आणि टॅब्लेटवर कार्टून, गेम आणि व्हिडिओ पाहतात. यामुळे त्यांच्या पालकांनाही काही दिलासा मिळतो, कारण मुले मोबाइल फोन पाहताना शांत राहतात. तथापि, दीर्घकाळ स्क्रीनवर राहिल्याने मुलांचे डोळे कमकुवत होऊ शकतात. जर तुम्ही या बालदिनी तुमच्या मुलांना मोबाइल फोन किंवा टॅबलेट भेट दिला असेल तर त्यांच्या डोळ्यांवर नकारात्मक परिणाम होऊ नये म्हणून काही सेटिंग्ज बदलण्याचा विचार करा. काही सेटिंग्ज बदलून तुम्ही तुमच्या मुलांना पुढील नुकसानीपासून वाचवू शकता. अशा पाच सेटिंग्जबद्दल जाणून घेऊया...**

- डार्क मोड चालू करा : फोन आणि टॅब्लेटमधील प्रकाश डोळ्यांना नुकसान पोहोचवण्याचे एक प्रमुख कारण आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही डार्क मोड चालू करू शकता. डार्क मोड डोळ्यांचा ताण कमी करण्यास मदत करू शकतो, विशेषतः कमी प्रकाशात किंवा रात्री वापरल्यास. म्हणून, तुम्ही डार्क मोड चालू करू शकता. ते चालू करण्यासाठी, सेटिंग्ज वर जा, नंतर डिस्प्ले आणि ब्राइटनेस वर जा. येथे, तुम्हाला डार्क मोड पर्याय दिसेल, जो तुम्ही चालू करू शकता.
- ऑटो ब्राइटनेस चालू करा : स्क्रीन खूप तेजस्वी असल्यास डोळे लवकर थकतात. खूप कमी प्रकाशदेखील हानिकारक आहे. म्हणून, ऑटो ब्राइटनेस चालू करा. फोन खोलीच्या ब्राइटनेसवर आधारित स्क्रीन ब्राइटनेस स्वयंचलितपणे समायोजित करेल. मुले जिथे जिथे त्यांचा मोबाइल किंवा टॅबलेट पाहतात तिथे त्यांच्या डोळ्यांना पुरेसा प्रकाश मिळेल. ही सेटिंग प्रत्येक फोनवर सहज उपलब्ध आहे. ब्राइटनेस सेटिंग ऑटो वर सेट करण्यासाठी, वरचा बार ड्रॅग करा आणि ऑटो निवडा.
- फॉन्ट आणि आयकॉन मोठे करा : लहान अक्षरे आणि बटणे पाहताना मुले डोळे मिचकावतात. यामुळे डोळ्यांवर ताण येतो. तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा आणि फॉन्ट आकार आणि डिस्प्ले आकार वाढवा. मोठ्या प्रतिमा मुलांना दूरवरून पाहणे सोपे करतील. डोळे कमी थकतील. सेटिंग्जमध्ये डिस्प्ले आणि सेटिंग्ज वर जा आणि फॉन्ट आणि डिस्प्ले आकार निवडा. येथे, तुम्ही फॉन्ट आणि डिस्प्ले आकार वाढवू शकता.
- स्क्रीन वेळ मर्यादा सेट करा : फोनमध्ये Digital Wellbeing आणि Parental Control पर्याय आहे. तुमचे मूल दररोज किती वेळ फोन वापरू शकते यावर तुम्ही मर्यादा सेट करू शकता. एकदा वेळ मर्यादा पूर्ण झाली की, फोन आपोआप लॉक होईल. हे तुमच्या मुलाला जास्त काळ स्क्रीनकडे पाहण्यापासून रोखेल. सेटिंग्जमध्ये जा, Digital Wellbeing किंवा Parental Control निवडा आणि स्क्रीन रिमाइंडर सेट करा. वेळ संपल्यावर हे रिमाइंडर पाठवेल आणि तुम्हाला तुमचा फोन बंद करण्याची सूचना मिळेल.
- ऑटो-लॉक चालू करा : ऑटो-लॉक चालू करा. तुमचा फोन ३० सेकंद किंवा १ मिनिटानंतर आपोआप लॉक होऊ द्या. मुले खेळताना अनेकदा त्यांच्या फोनकडे पाहत राहतात. स्क्रीन लवकर बंद झाल्याने त्यांच्या डोळ्यांना मध्ये मध्ये विश्रांती मिळेल. हे करण्यासाठी, सेटिंग्जमध्ये जा, नंतर डिस्प्लेवर जा आणि ऑटो लॉक/स्क्रीन टाइमआउट अंतर्गत वेळ कमी करा.

# तेच प्रॉमिस करा, जे पाळू शकाल...

- **पाण्याने खराब झाला लाखोंचा वॉटरप्रुफ स्मार्टफोन!**
- **कंपनीला द्यावे लागणार आता फोनच्या किंमतीपेक्षा जास्त पैसे...**

**आजकाल, स्मार्टफोन अनेक शक्तिशाली फिचर्ससह येतात. चांगल्या फिचर्सचे स्मार्टफोन खूप महागही असतात. उत्कृष्ट कामगिरी, दीर्घ बॅटरी लाइफ आणि अद्भुत कॅमेऱ्यामुळे लोक लाखो रुपयांचे स्मार्टफोन खरेदी करतात. पण जर कंपनीने केलेले हे दावे खोटे ठरले तर काय? अलिकडेच एक प्रकरण समोर आले आहे, ज्यामध्ये एका ग्राहकाने दीड लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचा स्मार्टफोन खरेदी केला. परंतु तो त्यांच्या अपेक्षा आणि कंपनीच्या दाव्यांवर खरा उतरला नाही. कंपनीने दावा केला होता की फोन वॉटरप्रूफ आहे, परंतु पावसाच्या पाण्यात भिजल्याने तो खराब झाला. हा फोन इतर कोणत्याही कंपनीचा नाही, तर सॅमसंगचा गॅलेक्सी झेड फोल्ड ४ आहे. लाखो रुपये गमावल्यानंतर, ग्राहकाने कंपनीविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला आणि आता सॅमसंगला फोनची किंमत आणि अतिरिक्त पैसे द्यावे लागत आहेत. चला संपूर्ण प्रकरण जाणून घेऊया...**



- २०२२ मध्ये खरेदी केला स्मार्टफोन : उत्तर प्रदेशातील संत कबीरनगर जिल्ह्यातील शक्ती विकास पांडे यांनी २८ डिसेंबर २०२२ रोजी खलिलाबाद येथील अग्रवाल टेलिकॉमकडून १,५७,९९८ रुपयांना सॅमसंग गॅलेक्सी झेड फोल्ड ४ स्मार्टफोन खरेदी केला. फोनच्या वैशिष्ट्यांबद्दल बोलताना, त्यांना सांगण्यात आले की तो पाणी प्रतिरोधक आहे, म्हणजेच पाण्याने तो खराब होणार नाही.
- पावसाच्या थेंबाने फोन खराब झाला : २६ सप्टेंबर २०२४ रोजी, फक्त हलक्या पावसामुळे फोन काम करणे बंद झाले. पांडे फोन दुरुस्त करण्यासाठी एका सेवा केंद्रात घेऊन गेले, परंतु तो अयशस्वी झाला. त्यानंतर त्यांनी जिल्हा ग्राहक आयोगाकडे धाव घेतली. न्यायालयाने या प्रकरणावर एक महत्त्वाचा निर्णय दिला.
- फोनच्या किमतीपेक्षा जास्त पैसे द्यावे लागणार : जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष सुरेंद्र कुमार सिंह आणि महिला सदस्य संतोष यांनी सॅमसंगला फोनची पूर्ण किंमत आणि व्याज द्यावे असा निर्णय दिला. ६० दिवसांच्या आत फोनची पूर्ण किंमत आणि १० टक्के व्याज, तसेच भरपाई म्हणून अतिरिक्त ३० हजार देण्याचे आदेश ग्राहक आयोगाने दिले आहेत.
- फोन वॉटर-रेझिस्टंट रेटिंगसह येतात... : तुमच्या माहितीसाठी, बहुतेक स्मार्टफोन वॉटर-रेझिस्टंट रेटिंगसह येतात. प्रत्येक फोनचे रेटिंग वेगळे असते. हे रेटिंग फोन किती वॉटर-रेझिस्टंट आहे आणि तो किती पाणी सहन करू शकेल हे दर्शवते. Samsung Galaxy Z Fold 4 सारखे फ्लॅगशिप फोन चांगल्या वॉटर-रेझिस्टंट रेटिंगसह येतात आणि कंपन्यांचा दावा आहे की हे फोन पाण्याने खराब होणार नाहीत. अशा परिस्थितीत, लाखो रुपयांच्या फोनला किरकोळ पाण्याने नुकसान होणे हे चिंतेचे कारण असू शकते. कंपन्यांनी त्यांच्या उत्पादनांबद्दल फक्त तेच दावे करावे जे ते खरोखर पूर्ण करू शकतात.

# एअर प्युरिफायरमध्ये काय असते CADR रेटिंग?

## तुम्ही तपासले नाही, तर पैसे खर्च करूनही स्वच्छ होणार नाही हवा

**शहरांमधील हवा अधिकाधिक प्रदूषित होत आहे. हानिकारक वायू लोकांना आजारी बनवत आहेत. कारचा धूर, कारखान्यातील वायू आणि बांधकामातील धूळ हवेला विषारी बनवत आहेत. बाहेर श्वास घेणे कठीण होते. घराच्या खिडक्या उघडल्यानेही प्रदूषित हवा येते. अशा परिस्थितीत एअर प्युरिफायर हा एक चांगला पर्याय आहे. हे मशीन खोलीतील हवा स्वच्छ करते. धूळ, धूर आणि लहान जंतू काढून टाकते. पण प्रत्येक प्युरिफायर सारखा नसतो. एअर प्युरिफायर खरेदी करताना, CADR रेटिंग नावाचा विशिष्ट क्रमांक शोधणे महत्त्वाचे आहे. एअर प्युरिफायर खरेदी करताना CADR रेटिंग जाणून घेणे का महत्त्वाचे आहे ते समजून घेऊया...**

- CADR रेटिंग काय दर्शवते? : CADR म्हणजे Clean Air Delivery Rate. सोप्या भाषेत सांगायचे तर, ते प्युरिफायर एका मिनिटात किती स्वच्छ हवा देऊ शकते हे दर्शवते. ही संख्या CFM मध्ये सांगितली जाते. CFM म्हणजे प्रति मिनिट घनफूट. ही संख्या जितकी जास्त असेल तितक्या लवकर हवा स्वच्छ होईल. उदाहरणार्थ, जर CADR 300 असेल तर तुम्हाला एका मिनिटात 300 घनफूट स्वच्छ हवा मिळेल.
- तीन प्रकारचे CADR का आवश्यक? : पहिला CADR धुरासाठी आहे. तो सिगारेटचा धूर किंवा बाहेरील वायू साफ करतो. दुसरा धूळसाठी आहे. तो घरात तरंगणारी धूळ आणि लहान कण काढून टाकतो. तिसरा फुलं आणि झाडांपासून निर्माण होणाऱ्या ॲलर्जींशी संबंधित आहे. चांगल्या मशीनमध्ये, तिन्ही संख्या अंदाजे समान असाव्यात. जर एक कमी असेल तर घाण काढली जाणार नाही. पॅकेजिंगवरील तिन्ही संख्या तपासा.
- खोलीच्या अनुसार CADR निवडा : प्युरिफायर खरेदी करण्यापूर्वी, खोलीचा आकार विचारात घ्या. लांबी, रुंदी आणि उंची मोजा. खोलीचा पूर्ण आकार घनफूटमध्ये मिळविण्यासाठी या तीन संख्यांचा गुणाकार करा. आता, खोलीच्या आकाराच्या दोन-तृतीयांश CADR निवडा. उदाहरणार्थ, १० फूट उंचीची २०० चौरस फूट खोली २००० घनफूट आहे. १३० ते १५० CFM चा CADR पुरेसा आहे. यामुळे तासाला चार ते पाच वेळा हवा स्वच्छ होईल.



- कमी CADR मध्ये काय समस्या आहे? : जर खोली मोठी असेल आणि CADR कमी असेल, तर मशीन रात्रभर चालेल. हवा अजूनही पूर्णपणे स्वच्छ राहणार नाही. ती जास्त वीज वापरेल आणि जास्त आवाज येईल. श्वास घेण्यास त्रास होत राहील. पैसे खर्च होतील पण कोणताही फायदा होणार नाही. म्हणून, CADR ला कधीही दुर्लक्ष करू नका.
- CADR ची चाचणी कशी केली जाते? : कोणतीही कंपनी स्वतःचे CADR रेटिंग तयार करत नाही. AHAM नावाच्या अमेरिकन संस्थेद्वारे त्याची चाचणी केली जाते. ते बंद खोलीत धूर, धूळ आणि इतर कण ठेवतात. मग, ते प्युरिफायर चालवतात. हवा किती लवकर स्वच्छ होते हे ते पाहतात. ही चाचणी अचूकपणे केली जाते. भारतातील अनेक कंपन्या AHAM कडून प्रमाणपत्र देखील मिळवतात. मशीनवर AHAM चिन्ह पहा. प्रमाणपत्राशिवाय रेटिंगवर विश्वास ठेवू नका.

# एआयने फोटो, व्हिडिओ बनवणाऱ्यांची खैर नाही!

**चीन सरकारचे महत्त्वपूर्ण पाऊल**

**आजकाल, इंटरनेटवर अस्सल आणि कृत्रिमरित्या तयार केलेल्या सामग्रीमध्ये फरक करणे लोकांना अधिक कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर चीन सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पुढील वर्षापासून चीनमधील इंटरनेट सुरक्षा नियम बदलतील. एआयद्वारे (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) तयार केलेल्या बनावट बातम्या आणि फोटोंच्या वाढत्या प्रसाराला रोखण्यासाठी चीनने हा निर्णय घेतला आहे.**



AI द्वारे तयार केलेली बनावट बातमी लोकांमध्ये गोंधळ पसरवते. जानेवारीमध्ये तिबेटमध्ये ६.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. ढिगाऱ्याखाली गाडलेल्या एका मुलाचे फोटो इंटरनेटवर व्हायरल झाले. नंतर असे आढळले, की हे फोटो खरे नव्हते, तर ते एआयने तयार केले होते. हे फोटो शेअर करणाऱ्या व्यक्तीला नंतर अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे, झेजियांग प्रांतातील एका पुरुषाने ऑनलाइन फोटो वापरून अपहरणाची कहाणी रचली. शिवाय, शांक्सी प्रांतातील एका महिलेने भूकंपामुळे झालेल्या नुकसानीचे अतिरेक करणारे एआय फोटो पोस्ट केले. त्यामुळे चीन सरकारने एआयचा हा गैरवापर रोखण्याचा निर्णय घेतला आहे.

### या लोकांना नवीन कायद्यानुसार शिक्षा

नवीन कायद्यानुसार, एआय वापरून बनावट किंवा हानिकारक सामग्री पसरवणाऱ्यांना शिक्षा होईल. एआय कंपन्यांना एआयने तयार केलेले सर्व फोटो आणि व्हिडिओ लेबल करावे लागतील, असे सांगून की ते एआयने तयार केलेले आहेत. बदललेले चेहरे आणि आवाज असलेली सामग्री तयार करणाऱ्या ॲप्सवर कारवाई केली जाईल. एआय प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडिया कंपन्यांना बनावट किंवा दिशाभूल करणाऱ्या सामग्रीचे निरीक्षण करावे लागेल आणि ते काढून टाकावे लागेल.

# स्कीममध्ये गुंतवणूक करून फसलात?

## नाही सापडत कोणता मार्ग?, येथे करा ऑनलाइन तक्रार...

**आजच्या डिजिटल जगात प्रत्येकजण ऑनलाइन शक्य तितकी कामे पूर्ण करून वेळ वाचवतो. अलिकडच्या काळात ऑनलाइन गुंतवणूक ही एक सामान्य पद्धत बनली आहे. तथापि, यामुळे आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमध्येही सतत वाढ होत आहे. जर तुम्ही गुंतवणुकीच्या नावाखाली फसव्या योजनेत गुंतवणूक करून अडकला असाल तर RBI ने तुमच्यासाठी SACHET नावाचे पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलवर लोक फसव्या गुंतवणूक योजना आणि आर्थिक फसवणुकीशी संबंधित तक्रारी दाखल करू शकतात. त्याबद्दल अधिक जाणून घेऊया...**

**SACHET पोर्टल म्हणजे काय?**

SACHET हे RBI ने सुरू केलेले एक ऑनलाइन पोर्टल आहे. त्याचा उद्देश लोकांना आर्थिक फसवणुकीची तक्रार करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे आहे. बऱ्याच वेळा बनावट आणि बेकायदेशीर चिट फंड सारख्या फसव्या योजनांमध्ये लोक पैसे गमावतात. अशा परिस्थितीत, SACHET लोकांना त्यांच्या तक्रारी RBI पर्यंत पोहोचवण्याचे साधन म्हणून काम करेल. या पोर्टलचे खास वैशिष्ट्य म्हणजे ते RBI, SEBI आणि IRDAI सारख्या संस्थांशी थेट जोडलेले आहे. शिवाय, या पोर्टलवर तक्रार दाखल केल्यानंतर, लोक त्यांच्या तक्रारीची स्थिती तपासू शकतील. शिवाय, या पोर्टलचा वापर कोणत्याही कंपनी किंवा संस्थेबद्दल तपशील मिळविण्यासाठी देखील केला जाऊ शकतो. आता या पोर्टलवर तक्रार कशी नोंदवायची ते समजून घेऊया.

**तक्रार कशी करावी**

जर तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या आर्थिक फसवणुकीची तक्रार करायची असेल, तर तुम्ही SACHET ॲपवर ते सहजपणे करू शकता. हे करण्यासाठीः प्रथम, तुम्हाला sachet.rbi.org.in ला भेट द्यावी लागेल. नंतर तक्रार दाखल करा पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर तुम्हाला काही माहिती विचारली जाईल. संबंधित कंपनी किंवा संस्थेचे नाव, पत्ता, राज्य आणि संपूर्ण तक्रारीची माहिती द्या. पुढे, तुमच्या तक्रारीची श्रेणी निवडा, जसे की फसवणूक योजना, अनधिकृत ठेव किंवा गुंतवणूक फसवणूक. तुमची तक्रार कोणत्या नियामक प्राधिकरणाच्या अंतर्गत येते याबद्दल तुम्हाला खात्री नसल्यास, तुम्ही नियामक सापडत नाही हा पर्याय निवडू शकता. तुमची तक्रार सबमिट करा. त्यानंतर तुम्हाला एक संदर्भ क्रमांक प्रदान केला जाईल. यामुळे तुम्हाला भविष्यात तुमच्या तक्रारीची स्थिती तपासता येईल.

## शॉर्ट न्यूज

### पैशांच्या वादातून दोन गटांत हाणामारी

■ **नगर :** तालुक्यातील गुंडेगाव शिवारात पैशांच्या उधारीच्या वादातून दोन गटांत हाणामारीची घटना घडली. या घटनेत दोघे जण जखमी झाले असून, अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सुरेश फाकट्या चव्हाण (वय ६०, रा. गुंडेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अविनाश सिध्दीकर चव्हाण, संगिता सिध्दीकर चव्हाण व सिध्दीकर फाकट्या चव्हाण (सर्व रा. गुंडेगाव) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पं.स.अधिकाऱ्यांचे काम बंद आंदोलन

■ **संगमनेर :** पंचायत समितीमध्ये समुदाय संसाधन अभियान व्यवस्थापक नंदलाल पोपट कोकाटे यांना काँग्रेसचे जिल्हा परिषदेचे भावी उमेदवार शरद नाना थोरात, त्यांचा मुलगा, पुतण्या आणि इतर ८-१० जणांनी फिल्मी स्टाईलने मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत कोकाटे जखमी झाले असून, त्यांच्यावर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेच्या निषेधार्थ संगमनेर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांसह सर्वच विभागांच्या अधिकाऱ्यांनी कामबंद आंदोलन करत आपला निषेध व्यक्त केला आहे.

### कोपरगावातील पेट्रोल पंपावर रांगा

■ **कोपरगाव :** आखाती देशांतील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे इंधन दरवाढ व टंचाई निर्माण होण्याच्या भीतीने कोपरगाव शहरातील पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली आहे. मात्र, दरवाढ आणि टंचाईबाबतच्या चर्चा अफवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीही भीतीपोटी नागरिक पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी पंपांवर धाव घेत असल्याने काही ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

### पाथर्डीत १५ वर्षीय मुलीचा विनयभंग

■ **पाथर्डी :** शहरात एका १५ वर्षीय नववीच्या विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी २१ वर्षीय परप्रांतीय कामगार आशिषकुमार बहु मुखिया याला अटक केली असून, त्याच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी बिहार राज्यातील सुपौल जिल्ह्यातील फुलवरीया येथील रहिवासी आहे.

### राम नवमीच्या मिरवणुकीवर दगडफेक

■ **श्रीरामपूर :** शहरात रामनवमीच्या उत्सवावर दगडफेकीची घटना घडली. गोंधवणी परिसरातील श्रीराम मंदिराच्या दिशेने निघालेल्या शोभायात्रेवर सय्यद बाबा चौकातील दर्गा परिसरात दगडफेक करण्यात आली. या घटनेत दोन जण किरकोळ जखमी झाले असून परिसरात तणाव निर्माण झाला आहे. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. सुयोग झिरंगे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मौलाना आणि १०-१२ अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अध्यात्म शिकवण्याच्या बहाण्याने महिलेवर बलात्कार

## भोंदूगिरीचा आणखी एक चेहरा उघड । मी शंकर तू पार्वती म्हणायचा हा बाबा

**पुणे : प्रतिनिधी**

**राज्यात अशोक खरात प्रकरणाची एसआयटी चौकशी सुरू असतानाच, आता वसईतील एका स्वयंघोषित भोंदू बाबाचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. स्वतःला शंकर म्हणवून घेत ''मी शंकर तू माझी पार्वती आहेस'' असे सांगत एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या ऋषिकेश वैद्य याच्याविरुद्ध वसईच्या माणिकपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ पावले उचलली असून, पुढील कायदेशीर कारवाईसाठी हे प्रकरण पुण्यातील मांजरी पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील ३५ वर्षीय पीडित महिलेची २०२३ मध्ये फेसबुकच्या माध्यमातून वसईतील आमची वसई संस्थेचा प्रमुख आणि स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्य याच्याशी ओळख झाली होती. वैद्य याने महिलेच्या धार्मिक वृत्तीचा गैरफायदा घेत अध्यात्म शिकवण्याच्या बहाण्याने जवळीक साधली आणि डिसेंबर २०२३ मध्ये पुण्यात तिची भेट घेतली. यावेळी आपण महादेवाचा अवतार असून तू माझी पार्वती आहेस असे भासवून त्याने महिलेला भुलवले आणि पुण्यातील मांजरी येथील एका लॉजमध्ये नेऊन तिला गुंगीकारक पदार्थ देऊन तिच्यावर अत्याचार केला. धक्कादायक बाब म्हणजे, या दरम्यान त्याने पीडितेचे अश्लील छायाचित्रेही काढली होती, ज्याचा वापर करून त्याने तिचे शोषण केल्याचे समोर आले आहे.

आरोपी ऋषिकेश वैद्य याने काढलेल्या अश्लील छायाचित्रांच्या आधारे पीडित महिलेला ब्लॅकमेल करून पुन्हा भेटीसाठी दबाव टाकला. मे २०२५ मध्ये वसईतील हॉटेल एक्सप्रेस इन येथे तिला बोलावून पुन्हा अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, नाशिकच्या अशोक खरात प्रकरणाची बातमी समोर आल्यानंतर पीडितेने हिंमत एकवटून घडलेला प्रकार पतीला सांगितला. त्यानंतर बुधवारी संध्याकाळी वसईच्या माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. बलात्काराची पहिली घटना पुण्यात घडल्याने तांत्रिक कारणास्तव हे प्रकरण पुढील तपासासाठी पुण्यातील मांजरी पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आले आहे.

माणिकपूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हिरालाल जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. पीडित महिलेने असाही खळबळजनक दावा केला आहे की, ऋषिकेश वैद्य याने स्वतः ला धर्मगुरू भासवून अनेक मुलींना आपल्या जाळ्यात ओढले असून त्यांचे लैंगिक शोषण केले आहे. आमची वसई या संस्थेचा बुरखा पांघरून अध्यात्माच्या नावाखाली चालणाऱ्या या धक्कादायक प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त होत असून, पोलिस आता इतर संभाव्य पीडितांचा शोध घेत आहेत.

# नगर शहर राममय !

## भजन, कीर्तन आणि रामनामाचा एकच जयघोष । अखंड नामस्मरण, भजन कीर्तनाने परिसर दुमदुमला । श्री रामनवमी उत्साहात साजरी



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत भक्तिभाव, शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात पार पडला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आणि ''श्रीराम जय राम जयजय राम'' या अखंड मंत्रजपाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता.**

पहाटे ६ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेकाने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि अयोध्येच्या धर्तीवर उभारलेली सजावट यामुळे मंदिर परिसर दिव्य आणि प्रसन्न भासत होता. सकाळी मंगल आरतीनंतर भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले. सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत सामूहिक नामजप व हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शेकडो भाविक एकसुरात मंत्रोच्चार करताना दिसले. मंत्रजपाच्या गजरात वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले होते. दुपारी बरोबर १२ वाजता प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव सोहळा पार पडताच मंदिर परिसरात टाळ्या, घंटानाद आणि ''जय श्रीराम''च्या जयघोषाने जल्लोष उसळला. भाविकांना सुरळीत व जलद दर्शन मिळावे यासाठी ट्रस्टच्यावतीने दर्शनबारी, स्वतंत्र प्रवेश-निर्गमन व्यवस्था, मंडप, पिण्याच्या पाण्याची सोय आदी सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना मार्गदर्शन करत संपूर्ण व्यवस्थापन यशस्वी केले. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले. गेल्या १९ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत होळी पौर्णिमेपासून ३१ दिवस शहरभर सामूहिक हनुमान चालीसा पठण, भजन संध्या आणि धर्मप्रसाराचे विविध कार्यक्रम घेतले जातात. यंदाही या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून शहरात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

प्रत्येक घराघरांत श्रीरामभक्तीचा संदेश पोहोचावा या उद्देशाने कार्यक्रमादरम्यान मोफत हनुमान चालीसा पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. तसेच दररोज श्रीरामचरितमानसातील चौपाई वाचन, आरती व प्रसाद वितरणाने कार्यक्रमाचा समारोप केला जात आहे. श्रीराम जन्मोत्सवाच्या दिवशी मंदिर दिवसभर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले होते.

दिवसभरात हजारो भाविकांनी श्रीरामांचे दर्शन घेत आध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला. गुरुवारी (दि.२ एप्रिल) पहाटे ६ वाजता श्री हनुमान जन्मोत्सवही याच ठिकाणी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांनी दिली.

## वाचकांच्या लेखणीतून

### भामटी



मी त्यावेळी मुंबईच्या नरिमन पॉईन्ट भागात बँक ऑफ इंडियात नोकरी करीत होतो. व्हीटी रेल्वे स्थानकातून बाहेर पडल्यावर बेस्ट बसने मी नरीमन पॉईन्टला उतरत असे.

एकदा सकाळी साडेदहाला बँकेत जाण्यासाठी डबल डेकर बस पकडली. बस फुल होती. खाली दरवाजातच मी कसाबसा उभा होतो.

बस सुरु झाली. पुढे चौकात सिग्नल लागला म्हणून बस उभी राहिली. एक मध्यम वयाची पंजाबी पेहराव केलेली महिला बसमध्ये चढली. पण ती पंजाबी नव्हती. तिची अंगयष्टी आणि हिंदीत बोलत असली तरी भाषेचा ढंगही तसा नव्हता. मधून मधून इंग्रजीही बोलायची. ती भिकारीही नव्हती एवढे नक्की. कंडक्टर तिकीट तिकीट करीत आमच्या दरवाजालगत आला. तशी ती महिला काहीतरी खुसपट काढून शेजारच्या पुरुषाशी विनाकारण भांडू लागली. मी माझे तिकीट घेतले आणि बाजूला गप्प उभा राहिलो. ती महिला त्या शेजारच्या पुरुषाशी भांडता भांडता कंडक्टरला चुकवीत बाजूला सरकली. हिचे तिकीट नंतर फाडू. तुर्तास हिच्याशी वाद घालणे नको अशा हेतूने कंडक्टर पुढे निघून गेला असावा. माझे त्या महिलेवर बारीक ध्यान होते. कारण तिचे बोलणे आणि वागणे मला संशयास्पद वाटत होते.

थोड्या वेळाने मंत्रालयाचा थांबा आला. सिग्नल पडला म्हणून बस उभी राहिली. ती महिला तिकीट न घेताच बसमधून उतरून तरातरा निघून गेली!

ती कोणत्या जातीधर्माची होती, हा मुद्दा नव्हता. ती एक प्रवृत्ती होती. भामटी प्रवृत्ती! मला खूप राग आला होता तिचा; पण काय करणार? कारण ती देव, देश अन् धर्मासाठी नाही; तर स्वतः साठी जगणारी दिसली!

नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# किल्लारीत रामनवमीला यात्रेचे स्वरूप

## १० हजार भाविकांचे रांगा लावून दर्शन

**किल्लारी : प्रतिनिधी**

**किल्लारी येथे रामनवमी उत्सवानिमित्त यंदा मोठ्या उत्साहात कार्यक्रम पार पडत असून, सुमारे १० हजार भाविकांनी श्रीरामाचे दर्शन घेतले. मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती असल्याने संपूर्ण उत्सवाला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.**

राष्ट्रीय संत मोरारीबापू यांच्या प्रेरणेतून भूकंपग्रस्तांचे मनोबल वाढविणे आणि भक्तीची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने किल्लारी येथे सुमारे चार एकर जागेत कोट्यवधी रुपयांचा भव्य राममंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरात रामनवमी निमित्त सिताराम ट्रस्ट, लातूर यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सोमवारपासून रामायण पारायण व भजन कार्यक्रम सुरू होते. रामनवमीच्या दिवशी दर्शनासाठी विशेषतः महिलांची मोठी गर्दी झाली होती.

दुपारी १२ वाजता रामजन्म सोहळा, महापूजा व आरती आमदार अभिमन्यू पवार, श्यामभाऊ बियाणी, ॲड. संतोष गिल्डा व श्रीरंग गिल्डा यांच्या हस्ते पार पडली. यानंतर महिलांनी पारंपरिक पद्धतीने पाळणा गाऊन रामजन्मोत्सव



साजरा केला.यावेळी सिताराम ट्रस्टच्या वतीने सर्व भाविकांसाठी महाप्रसाद व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान, नीलकंठेश्वर मंदिर ते राममंदिर मार्गावर मिरवणूक काढण्यात आली. यात उमरगा, औसा, निलंगा, लोहारा किल्लारीसह अनेक गावांतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गॅस नाही, लाकडावर महाप्रसादाची तयारी गॅसची सुविधा उपलब्ध नसतानाही पारंपरिक पद्धतीने लाकडावर स्वयंपाक करून १० हजार भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. तसेच किल्लारी पाटी येथे व्यापारी मित्र मंडळाच्या वतीने रामजयंती साजरी करण्यात आली. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# गोपीनाथ मुंडे नाव कधीही जगाला विसरू देणार नाही

## भायाळा गावात पंकजा मुंडे भावूक वडिलांच्या आठवणींनी वातावरण भारावलं

**बीड : प्रतिनिधी**



**दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींनी भारावून मंत्री पंकजा मुंडे यांनी भायाळा गावातील कार्यक्रमात अत्यंत भावनिक भाषण केले. गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरू देणार नाही, ही शपथ मी त्यांच्या चितेवर घेतली आहे, असे सांगताना त्या भावूक झाल्या. माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायात घातले तरी तुमचे ऋण फेडता येणार नाही, अशा शब्दांत त्यांनी कार्यकर्ते आणि जनतेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे कार्यक्रमात उपस्थितांनाही भावनिक क्षण अनुभवायला मिळाला.**

विधानसभेचे अधिवेशन संपल्यानंतर पंकजा मुंडे बीड दौऱ्यावर होत्या. दिवसभरात त्यांनी श्रीराम नवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांना उपस्थिती लावली. त्यानंतर पाटोदा तालुक्यातील भायाळा गावात गणेशानंद गडावर आयोजित नारळी सप्ताह कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी आपल्या राजकीय आणि वैयक्तिक प्रवासातील अनेक अनुभव सांगितले.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर काही कार्यकर्त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतल्याची वेदनादायक बाब त्यांनी व्यक्त केली. तुमचं माझ्यावर इतकं प्रेम आहे की ते शब्दांत मांडता येणार नाही, असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांना प्रतिसाद दिला. तसेच भगवानगड येथे उभारल्या जाणाऱ्या माऊली मंदिरासाठी मोठ्या प्रमाणात देणगी देणाऱ्या भाविकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांच्या पदराने दृष्ट काढत त्यांचा सन्मान केला.

(पान १ वरून)

### कर्तव्य बजावताना पोलिसांवर हल्ला

घटनास्थळी बोलावून घेतले. काही वेळातच मोठा जमाव एकत्र येऊन पोलिसांना घेराव घालत आक्रमक झाला.

जमावाने पोलिसांना अश्लील शिवीगाळ करत धक्काबुक्की केली आणि अचानक दगडफेक सुरू केली. या हल्ल्यात पोलीस कॉन्स्टेबल सुनील मालणकर यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे आणि भगवान धुळे हे जखमी झाले. जखमींवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या घटनेप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ३१ नामनिर्देशित आरोपींसह सुमारे ७० अनोळखी व्यक्तींवर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी योगेश बेरड, दीपक बेरड, देविदास बेरड, राजू बेरड, मयूर पुंड आणि धर्मा बेरड यांना ताब्यात घेतले असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करीत आहेत. या घटनेमुळे पोलिसांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### धोक्याच्या छायेत 'गॅस काळाबाजार'!

आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे आणि त्यांच्या पथकाने शहरात गस्त सुरू केली होती.

२६ मार्च रोजी दुपारी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, साद खानच्या सांगण्यावरून शहानवाज सय्यद हा कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता घरगुती गॅस टाक्यांमधून गॅस काढून इतर टाक्यांमध्ये भरत असल्याचे समोर आले. त्यानंतर पथकाने तात्काळ छापा टाकून सय्यद याला मुद्देमालासह ताब्यात घेतले.भरवस्तीत ज्वलनशील गॅसची निष्काळजी हाताळणी करून नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

या कारवाईत ११ हजार रुपये किमतीच्या एचपी कंपनीच्या १० रिकाम्या व १ भरलेली गॅस टाकी, २० हजार रुपये किमतीची गॅस भरण्याची इलेक्ट्रिक मोटार यंत्रणा आणि ५ लहान गॅस टाक्या असा एकूण ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गोसावी करत आहेत.

### जमिनीच्या वादातून 'जादूटोणा'चा प्रकार

समोर आले. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपीने स्वतः किंवा इतरांच्या माध्यमातून जादूटोणा करून त्यांना इजा पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित वृद्धाने तातडीने पोलिसांकडे धाव घेतल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी व पोलीस हवालदार दिवटे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या अशा प्रकारांविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला असून, आरोपीचा शोध सुरू आहे.

### श्रीपाद छिंदमला महापालिकेतून हाकललं !

केली. या भूमिकेला भाजपाचे अमोल येवले यांनीही समर्थन दिले, तर शिवसेनेच्या दोन्ही गटांनीही एकमुखाने छिंदमला बाहेर काढण्याची मागणी केली.

संपत बारस्कर यांनी छिंदम याला स्वतःहून बाहेर जाण्याचा इशारा दिला. मात्र वातावरण अधिकच तापले आणि काही नगरसेवक आक्रमक होत थेट त्याच्या दिशेने धावले. शेवटी सर्व नगरसेवकांनी एकत्र येत छिंदमला सभागृहाबाहेर काढले.

# टिकाव-नारळ घेऊन अधिकारी थेट दारात !

## २५ घरकुलांचे भूमिपूजन संपन्न । गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांचा पुढाकार

कान्हूर पठार : प्रतिनिधी

आवास दिनाच्या निमित्ताने कान्हूर पठार येथे ग्रामविकासाला चालना देणारा अभिनव उपक्रम राबवित एका दिवसात तब्बल २५ घरकुलांच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या मोहिमेमुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रलंबित कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



### 'ऑन फील्ड' उपक्रम

घरकुल योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी गटविकास अधिकारी सोनकुसळे यांनी गावात प्रत्यक्ष भेटी देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. ते स्वतः टिकाव, नारळ आणि गुलाल घेऊन लाभार्थ्यांच्या घरी जाऊन भूमिपूजन करत असून, प्रशासनाचा हा 'ऑन फील्ड' सहभाग विशेष लक्षवेधी ठरत आहे.

### अनुदानासह सोलर सुविधा

घरकुल लाभार्थ्यांना शासनाकडून दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आर्थिक सहाय्य दिले जात आहे. त्यात १ के.व्ही क्षमतेची सोलर यंत्रणा व घरबांधणीसाठी थेट अनुदान यांचा समावेश आहे. यामुळे ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना वीज आणि निवारा या दोन्ही मूलभूत गरजांचा एकत्रित लाभ मिळत आहे.

### जमीन नसलेल्यांसाठीही दिलासा

ज्या लाभार्थ्यांकडे घर बांधण्यासाठी स्वतःची जागा नाही, त्यांच्यासाठी शासनाने विशेष तरतूद केली आहे. पंडित दिनदयाळ योजना अंतर्गत जागा खरेदी केल्यानंतर १ लाख रुपयांचे अतिरिक्त अनुदानदेण्यात येणार असल्याची माहिती सोनकुसळे यांनी दिली.

### गावाची घरकुल स्थिती

कान्हूर पठारमधील घरकुल योजनेची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे. एकूण मंजूर घरकुले : २०२, पूर्ण झालेली/प्रगतीत : १०९प्रलंबित कामे : ९३. ही प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

### मान्यवरांची उपस्थिती

या भूमिपूजन कार्यक्रमाला विस्तार अधिकारी बाळासाहेब मेहत्रे, सरपंच संध्या ठुबे, ग्रामसेवक भास्कर सिनारे, सदस्य श्रीकांत ठुबे, विशाल लोंढे, शारदा साळवे गंगुबाई तांबे, सुनीता गायखे, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामरोजगार सेवक यांची प्रमुख उपस्थिती होती.

### २५ कुटुंबांचे 'घरकुल' स्वप्न साकारतेय

भूमिपूजन झालेल्या २५ लाभार्थ्यांमध्ये संगीता लोंढे, कलाबाई लोंढे, अंजबापू लोंढे, भाऊसाहेब ठुबे, नंदा जेडगुले, झुंबर ठुबे, भीमाबाई वाघुडे, सचिन नवले यांच्यासह अनेक कुटुंबांचा समावेश आहे. स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत असल्याने लाभार्थ्यांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे.

### लाभार्थ्यांना संदेश

''घरकुल योजना ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. लाभार्थ्यांनी वेळेत बांधकाम पूर्ण करून प्रशासनास सहकार्य करावे,'' असे आवाहन गटविकास अधिकारी सोनकुसळे यांनी केले. योजनेंतर्गत मिळणाऱ्या सुविधा व अनुदानाचा योग्य वापर करण्यावरही त्यांनी भर दिला.

### ग्रामविकासाला नवे बळ

या उपक्रमामुळे घरकुल योजनेची अंमलबजावणी वेगाने होत आहे, लाभार्थ्यांचा प्रशासनावर विश्वास वाढत आहे गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत आहे. 'आवास दिन' निमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम कान्हूर पठारसाठी आदर्श ठरत असून, प्रलंबित घरकुल पूर्णत्वाकडे नेण्यासाठी तो महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### प्रलंबित कामांसाठी विशेष ड्राइव्ह

घरकुलांची अपूर्ण कामे वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी अधिकारी स्वतः गावात भेटी देत आहेत, लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला जात आहे, कामातील अडचणी तत्काळ सोडवल्या जात आहेत. यामुळे कामांना गती मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

# रामनवमी सण नव्हे; आदर्श जीवनाची प्रेरणा

## लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांचे प्रतिपादन । निघोजला रामजन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा

निघोज : प्रतिनिधी

**रामनवमी हा केवळ सण नसून सत्य, धर्म आणि आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देणारा पवित्र दिवस आहे, असे प्रतिपादन लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांनी केले.**

निघोज येथे प्रभू राम जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.गुरुवार (दि. २६) रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत आळंदी येथील लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांचे रामनवमी निमित्त कीर्तन पार पडले. या कीर्तनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम हे केवळ देव नसून आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या जीवनातून कर्तव्यनिष्ठा, संयम, प्रामाणिकपणा आणि नात्यांप्रती असलेली बांधिलकी शिकायला मिळते. आजच्या धावपळीच्या जीवनातही रामांचे विचार मार्गदर्शक ठरतात असेही कदम शास्त्री यांनी सांगितले.

यावेळी माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकर कवाद यांच्या हस्ते कदम महाराज यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आठ दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचे चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित करणारे दत्तात्रय रामचंद्र लंके यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ महाराज वरखडे यांनी केले, तर कोषाध्यक्ष रामदासशेठ वरखडे यांनी सहकार्य केले. रमेश महाराज लंके, निवृत्ती महाराज तनपुरे व महादेव महाराज कवाद यांनी आभार मानले.



### बालसंस्कारांचे महत्त्व अधोरेखित

आजच्या काळात आध्यात्मिक संस्कारांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. निघोज येथील नंदू महाराज वराळ गेल्या अनेक वर्षांपासून बालसंस्कार शिबिराच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य करीत आहेत. ते निस्वार्थ भावनेने समाजसेवा करत असून, असा सुपुत्र निघोज गावात जन्माला येणे हे गावाचे भाग्य असल्याचे गौरवोद्गार लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांनी काढले.

### फुलांच्या वर्षावात आनंदोत्सव

रामजन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. प्रभू रामचंद्रांच्या जन्मावेळी फुलांचा वर्षाव करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. संपूर्ण वातावरण भक्तीमय व उत्साहपूर्ण झाले होते.

### शांतता ,समाधानासाठी प्रार्थना

रामनवमी हा सण आपल्या संस्कृती, परंपरा आणि मूल्यांची आठवण करून देणारा आहे. मन, विचार आणि आचरण शुद्ध करण्याची ही एक संधी आहे. प्रभू रामांच्या कृपेने जीवनात शांतता, समाधान आणि यश लाभो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

# आई-बापाच्या कष्टांना यशाची गोड भेट !

## तनपुरेवाडीच्या लेकरांची 'मिशन आरंभ'मध्ये भरारी

निघोज : प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्हा परिषदेमार्फत शिष्यवृत्ती पूर्वतयारीसाठी घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी 'मिशन आरंभ' परीक्षेत तनपुरेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. कष्ट करून भवितव्य घडविणाऱ्या आई बापाला विद्यार्थ्यांनी ही यशाची गोड भेट दिली आहे.




### गुणवंत विद्यार्थी

या परीक्षेत विराज भरत रसाळ याने २५२ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या पाठोपाठ कैवल्य योगेश कवाद २५० गुण, ओम दिलीप लंके २४८ गुण, कार्तिकी प्रवीण श्रीमंदिलकर २४४ गुण, प्रिन्स सुरेश यादव २३२ गुण, त्रिशा विशाल लंके २२२ गुण, रुद्रांश प्रवीण नखाते २१२ गुण. या विद्यार्थ्यांनी विशेष नैपुण्य प्राप्त करत शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित केली.

### गुणवत्तेची परंपरा कायम

तनपुरेवाडी शाळेचा एकूण निकाल ७७ टक्के लागला असून, सातत्याने उत्कृष्ट निकाल देण्याची परंपरा यंदाही कायम राखण्यात शाळेला यश आले आहे.

### सर्व स्तरातून कौतुक

या यशाबद्दल ग्रामस्थ, पालक व विविध मान्यवरांनी शाळेचे अभिनंदन केले.गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार, विस्तार अधिकारी देवराम पिंपरकर, केंद्रप्रमुख नारायण बाचकर, उपसरपंच माऊली वरखडे, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच माजी विद्यार्थी संघ व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.मुख्याध्यापक बन्सी गुंड यांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले.

### सर्वांगीण विकासाची ओळख

तनपुरेवाडी शाळा ही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणारी तालुक्यातील नावाजलेली शाळा असल्याचे प्रतिपादन सरपंच चित्राताई वराळ यांनी केले. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

### मेहनत आणि मार्गदर्शन

विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा यामुळे तनपुरेवाडी शाळेने 'मिशन आरंभ' परीक्षेत यशाचा नवा अध्याय लिहिला असून, भविष्यातही अशीच कामगिरी कायम राहील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# बाल विवाहावर 'उडान'चा प्रहार

## । पारनेरमध्ये जागृतीची ठिणगी
## । सम्राट अशोक जयंतीनिमित्त सामाजिक प्रबोधन

पारनेर : प्रतिनिधी

चक्रवर्ती सम्राट अशोक महान यांच्या जयंतीचे औचित्य साधत पारनेर शहरात बालविवाह प्रतिबंधासाठी प्रभावी जनजागृती अभियान राबविण्यात आले. स्नेहालय संस्थेच्या 'उडान' प्रकल्पांतर्गत आयोजित या उपक्रमातून बालविवाह रोखणे, शिक्षणाचे महत्त्व, आरोग्य आणि पुनर्वसन याबाबत नागरिकांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.



### 'उडान'ची सामाजिक बांधिलकी

आजच्या आधुनिक युगातही समाजात बालविवाहाची प्रथा कायम असल्याची खंत व्यक्त करत 'उडान' प्रकल्पाने या समस्येवर मुळातून उपाय करण्याचा निर्धार केला आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ बालविवाह रोखणे नसून, पीडित मुलींना शिक्षण, आरोग्य सुविधा आणि स्वावलंबनाचा मार्ग उपलब्ध करून देणे हा आहे.

### सामाजिक परिवर्तनासाठी शपथ

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी बालविवाह रोखण्यासाठी व समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी कटीबद्ध राहण्याची शपथ घेतली. सम्राट अशोक यांच्या 'धम्म' विचारांनुसार सामाजिक न्याय व समतेचा संदेश देणारे हे अभियान पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागात मोठी जनजागृती निर्माण करणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

### बालविवाहाचे दुष्परिणाम

या अभियानात 'उडान' प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. गायकवाड म्हणाले, ''बालविवाह हा केवळ कायद्याचा भंग नसून, एका बालकाचे भविष्य अंधारात ढकलणारा अन्याय आहे. प्रत्येक मुला-मुलीला शिक्षण व सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.'' त्यांनी बालविवाहाचे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम स्पष्ट करत शिक्षण आणि आरोग्याच्या महत्त्वावर विशेष भर दिला.

### उत्स्फूर्त सहभाग

या अभियानाला समाजातील विविध स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी राजेंद्र करंदीकर, श्रावण गायकवाड, सुरेश रोकडे, बाळासाहेब पातारे, देवेंद्र जाधव, रमेश गायकवाड, संतोष वाबळे, संतोष अडसूळ, मोहन कसबे, वसंत पाडळे, दादाभाऊ पटेकर, गौतम सूर्यवंशी, प्रकाश करंदीकर, सुनील चौधरी, जनार्दन सोनवणे, सुभाष गायकवाड, प्रदीप नगरे, चंद्रकांत शिंदे, महेंद्र बोरुडे, प्रदीप कसबे, राजू उघडे यांसह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्हिएतनाममध्ये पारनेरचा मान उंचावला!

## कवी रामदास पुजारी यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कार'



पारनेर : प्रतिनिधी

तालुक्याचे सुपुत्र, कवी-लेखक व निवृत्त सहायक वनसंरक्षक रामदास पुजारी यांनी आपल्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याच्या बळावर आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला आहे. हनोई (व्हिएतनाम) येथे आयोजित सहाव्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनात त्यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने त्यांच्या साहित्य, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

### संवेदनशील लेखणी

रामदास पुजारी यांच्या लेखणीतून सामाजिक भान आणि पर्यावरणाची जाणीव प्रभावीपणे उमटते. 'आई माझं जग', 'उद्याच्या श्वासासाठी', 'खोल मनाच्या तळाशी' हे काव्यसंग्रह तर 'पर्यावरणविषयक घोषवाक्ये' ही पुस्तिका त्यांच्या सर्जनशीलतेचे प्रतीक आहेत. वने, वन्यजीव आणि पर्यावरण संरक्षणाच्या जनजागृतीसाठी त्यांनी वृत्तपत्रे, मासिके, आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमांतून लेख, कविता, घोषवाक्ये आणि व्याख्याने देत सातत्याने कार्य केले आहे.

### 'निसर्गासाठी सर्वांनी पुढे या'

२१ मार्च रोजी जागतिक वनदिनी आयोजित या संमेलनात पुजारी यांनी 'आंबेडकरवादी विश्व साहित्य व वंचितांचे प्रश्न' या परिसंवादात सहभाग घेतला. 'नेचर फॉर ऑल' आणि 'ऑल फॉर नेचर' या संकल्पनेवर भर देत त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी 'माझी वसुंधरा माझी आई' ही कविता सादर करून उपस्थितांना भावूक केले.

### सर्व स्तरांतून अभिनंदन

या आंतरराष्ट्रीय सन्मानानंतर पारनेर तालुक्यासह विविध स्तरांतून रामदास पुजारी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या कार्यामुळे स्थानिक पातळीवरील साहित्यिकांना नवसंजीवनी मिळत असून, पारनेरच्या नावाला जागतिक ओळख मिळाली आहे.

# ''दिवसे युगा''ची सुरुवात!

## फलके यांच्या रूपाने महिला आघाडीला नवी ताकद!





पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका प्राथमिक शिक्षक समितीचे त्रैवार्षिक अधिवेशन नुकतेच सुगंधाबाई स्मारक येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शिक्षक संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या अधिवेशनाला राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.**

या अधिवेशनाला राज्य नेते उदय शिंदे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. तसेच राज्य उपाध्यक्ष रा. या. औटी, विभागीय अध्यक्ष संजय धामणे, जिल्हाध्यक्ष सीताराम सावंत, जिल्हा सरचिटणीस विजय महामुनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक संभाजी औटी यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार सोपान राऊत यांनी मानले. या अधिवेशनातून शिक्षक संघटनेला नवे नेतृत्व लाभले असून, आगामी काळात शिक्षकांच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### मच्छिंद्र दिवसे तालुकाध्यक्ष

अधिवेशनादरम्यान जिल्हाध्यक्ष सीताराम सावंत यांनी पुढील तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये मच्छिंद्र दिवसे यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून संघटनेची धुरा त्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे.मुख्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे : कार्याध्यक्ष : सोपान राऊत, सरचिटणीस : संपत म्हस्के कार्यकारी अध्यक्ष : प्रमोद झावरे, कोषाध्यक्ष : पंकज झरेकर, कार्यचिटणीस : सुभाष मगर, उपाध्यक्ष : सुधाकर आढाव, दिलीप उघडे, विजय साठे.

### आशा फलके यांच्या हाती महिला आघाडी

महिला आघाडीच्या अध्यक्षपदी आशा फलके यांची निवड करण्यात आली. महिला आघाडीच्या कार्यकारिणीत : कार्याध्यक्ष : कांता फापाळे, सरचिटणीस : नीता शिंगोटे, कार्यकारी अध्यक्ष : वृषाली गायकवाड, बीकोषाध्यक्ष : रंजना पवार, कार्यचिटणीस : कमल साठे, तसेच उपाध्यक्ष, सहचिटणीस व जिल्हा प्रतिनिधी पदांवरही विविध सदस्यांची निवड जाहीर करण्यात आली.

### जिल्हा प्रतिनिधी व सल्लागार

संघटनेच्या कामकाजाला गती देण्यासाठी जिल्हा प्रतिनिधी व सल्लागार मंडळाचीही घोषणा करण्यात आली. यामध्ये संभाजी औटी, जयप्रकाश साठे, राजेंद्र दाते, दिनकर ढोकळे यांचा समावेश आहे. तसेच शिवाजी काकडे, रामदास गाढवे आदींना सल्लागार म्हणून जबाबदारी देण्यात आली.

# पळवे खुर्दमध्ये 'जय बजरंगबली'चा निनाद

## मारुती मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात । वैदिक विधी, ग्रामप्रदक्षिणा, कीर्तन व महाप्रसादाने भक्तिमय वातावरण

पळवे खुर्द : प्रतिनिधी

पळवे खुर्द येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री मारुती मंदिराचा लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळा बुधवार (दि. २५) रोजी अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक वैभवात पार पडला. ग्रामस्थांच्या सामूहिक सहभागातून साकारलेल्या या धार्मिक सोहळ्याने संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. दिवसभर विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.



### पहाटेपासून धार्मिक विधी

सोहळ्याची सुरुवात पहाटेपासूनच झाली. गणेशपूजन, पुण्याहवाचन, अभिषेक, होम-हवन आदी विधी नियोजनबद्ध पद्धतीने पार पडले. ब्राह्मणांच्या साक्षीने आणि वैदिक मंत्रोच्चाराच्या निनादात सहा जोड्यांना बसवून श्री मारुती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. मूर्ती प्राणप्रतिष्ठा हवन, पूर्णाहुती विधी यावेळी वातावरण अत्यंत पवित्र आणि भारावलेले झाले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या विधींमध्ये सहभाग घेतला.

### ग्रामस्थांच्या एकोप्याचे दर्शन

या मंदिर उभारणीसाठी गावातील सर्वच घटकांनी एकदिलाने योगदान दिले. वर्गणीच्या माध्यमातून आणि स्वयंसेवी भावनेतून उभे राहिलेले हे मंदिर गावाच्या एकात्मतेचे प्रतीक ठरले आहे. सोहळ्याच्या निमित्ताने गावातील सर्व वयोगटातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### उत्कृष्ट नियोजन

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब शेळके यांनी प्रभावीपणे केले, तर नानाभाऊ गाडीलकर आणि अमोल शेळके यांनी आभार प्रदर्शन केले. सुयोग्य नियोजन, स्वयंसेवकांचे योगदान आणि ग्रामस्थांचा उत्साह यामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. श्री मारुती मंदिराच्या लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याने पळवे खुर्दमध्ये केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश दिला. हा सोहळा गावाच्या इतिहासात एक संस्मरणीय अध्याय ठरला आहे.

**महाप्रसाद** कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. या वेळी शशिकांत देशमुख (अध्यक्ष, श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्ट), रामदास तरटे (माजी सरपंच), विनोद पाचारणे, ऋषीकेश तरटे, रुपेश गुंड, विक्रांत देशमुख, दिनेश गवळी, गोरख साबळे, अशोक गवळी, शहाजी देशमुख, संतोष शिंदे, रावसाहेब भंडलकर, सूर्यभान जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

### पुढील धार्मिक विकासकामांना गती

गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून लवकरच मूर्ती स्थापना करण्यात येणार आहे. तसेच तांदळेश्वर देवस्थानाच्या जीर्णोद्धाराचे कामही लवकरच हाती घेतले जाणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.दरम्यान, वर्गणी देणे बाकी असलेल्या भाविकांनी त्वरित आपले योगदान जमा करावे, असे आवाहनही करण्यात आले.

### दिमाखदार ग्रामप्रदक्षिणा

दुपारी ४ वाजता श्री हनुमान मूर्तीची भव्य ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. ढोल-ताशे, लेझीम, पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही मिरवणूक पार पडली. ''जय बजरंगबली'', ''हनुमान की जय'' अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महिलांनी रांगोळ्या काढत मिरवणुकीचे स्वागत केले, तर युवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

### कीर्तनातून अध्यात्मिक ऊर्जा

सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. संतोष महाराज खेडकर यांचे प्रभावी कीर्तन झाले. कीर्तनामध्ये बजरंगबलीचा महिमा, भक्तीचे महत्त्व आणि समाजातील नैतिक मूल्ये यांवर मार्मिक भाष्य करण्यात आले. भक्तीवेदांत वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थीही यावेळी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिकच आध्यात्मिक रंग चढला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com